बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बँक

निगमित संप्रेषण व निवेशक संबंध

प्रधान कार्यालय: लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे-5

टेलि - 020 25614495, 25614366, 25514501 से 12 विस्तार.

वृत्तपत्रीय निवेदन

# पुण्यातील येरवडा मध्यवर्ती कारागृहातील सहवासीसाठी बँक ऑफ महाराष्ट्र तर्फे महाबँक ग्रामीण स्वयंरोजगार व उद्योजकता प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून प्रशिक्षण कार्यक्रम

**पुणे दिनांक ७ डिसेंबर २०२१ :** पुण्यातील येरवडा मध्यवर्ती कारागृहातील सहवासींसाठी बँक ऑफ महाराष्ट्रच्या महाबँक ग्रामीण स्वयंरोजगार व उद्योजकता प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून कौशल्य प्रशिक्षण देण्याची योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. येरवडा मध्यवर्ती कार्यालयात झालेल्या एका कार्यक्रमात सदर योजनेचे उद्घाटन करण्यात आले. महाराष्ट्र राज्याचे अतिरिक्त पोलीस महासंचालक ( कारागृहे ) श्री अतुलचंद्र कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली बँक ऑफ महाराष्ट्रच्या महाबँक ग्रामीण स्वयंरोजगार व उद्योजकता प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून कारागृहातील सहवासींचे पुनर्वसन व सामाजिक समावेशन सुलभ करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून सुरवातीला सुमारे १०० कारागृहवासींसाठी ही योजना सुरु करण्यात आली आहे. बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक श्री ए बी विजय कुमार हे प्रमुख पाहुणे म्हणून व श्री अतुल्चंद्र कुलकर्णी हे सन्मानीय पाहुणे म्हणून कार्यक्रमाला उपस्थित होते. पोलीस उपमहानिरीक्षक ( कारागृहे ) श्री योगेश देसाई , बँक ऑफ महाराष्ट्राच्या पुणे पूर्व विभागीय कार्यालयाचे विभागीय व्यवस्थापक श्री विवेक धवन, येरवडा मध्यवर्ती कारागृहाच्या अधीक्षक श्रीमती राणी भोसले , बँक ऑफ महाराष्ट्रच्या महाबँक ग्रामीण स्वयंरोजगार व उद्योजकता प्रशिक्षण संस्थेतील अधिकारी या कार्यक्रमास उपस्थित होते.

“ कारागृहवासींनी बँकेकडे येण्याच्या ऐवजी बँकेने कारागृहवासीयांना प्रशिक्षित करून बँक ऑफ महाराष्ट्रने एक मोठीच झेप घेतली आहे आणि एकदा कारागृहातून मुक्तता झाल्यावर कारागृहवासीयांना आपला रोजगार मिळविता येण्यासाठी साधे सोपे पण अतिशय परिणामकारक प्रशिक्षण कार्यक्रम तयार करण्यात आले आहेत ” असे उद्गार महाराष्ट्र राज्याचे अतिरिक्त पोलीस महासंचालक ( कारागृहे ) श्री अतुलचंद्र कुलकर्णी यांनी आपल्या भाषणात काढले. तसेच कारागृहवासीयांना महाबँक ग्रामीण स्वयंरोजगार व उद्योजकता प्रशिक्षण संस्थेकडून प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल व बँक ऑफ महाराष्ट्रच्या वतीने योग्य अशी कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल असेही श्री अतुलचंद्र कुलकर्णी यांनी सांगितले.

यावर्षी आपण स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करीत असल्यामुळे सदर प्रशिक्षण कार्यक्म म्हणजे कारागृहवासीयांसाठी काही नवीन शिकण्याची व स्वतःला विकसित करून स्वतःच्या पायावर उभी राहण्याची एक उत्तम संधी असल्याचे बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक श्री ए बी विजय कुमार यांनी याप्रसंगी केलेल्या भाषणात सांगितले. पंतप्रधान स्वनिधी योजना ही छोट्या विक्रेत्यांसाठी कशी वरदान ठरत आहे हे श्री विजयकुमार यांनी ठळकपणे निदर्शनास आणून दिले व प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण केल्यावर कारागृहवासियांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी बँकेच्या अन्य योजनांच्या सोबतच पंतप्रधान स्वनिधी योजनेचा लाभ घ्यावा असे ठाम प्रतिपादन केले. बँक ऑफ महाराष्ट्र महाबँक ग्रामीण स्वयंरोजगार व उद्योजकता प्रशिक्षण संस्थेच्या राज्यभरातील ७ शाखांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये आदर्श प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करेल असेही त्यांनी सांगितले.

महाबँक ग्रामीण स्वयंरोजगार व उद्योजकता प्रशिक्षण संस्था कुक्कुटपालन, घरगुती उपकरणांची दुरुस्ती व सेवा, तसेच पापड, मसाला व लोणचे तयार कार्ये या तीन प्रवर्गात सुमारे १०० कारागृहवासियांना प्रशिक्षण देत आहे. सदर प्रशिक्षणासाठी निवड झालेले कारागृहवासी हे पुढील सहा महिन्यात कधीही कारागृहातून मुक्त होतील.